# एक करुणामय स्वागत

## स्वामी सिद्धानंद

वर्ष १९७२मध्ये, शिकागो शहरानजीक असलेल्या कॉलेजमध्ये, एका प्रायोगिक कार्यक्रमात मी भारतीय तत्त्वज्ञान आणि गूढवाद हे विषय शिकवत असे. प्राचीन योगशास्त्रांमध्ये ज्यांचे वर्णन केले गेले आहे, चेतनेच्या त्या अवस्थांची प्रत्यक्ष अनुभूती घेण्याची रुची माझ्यात निर्माण झाली होती आणि म्हणून मी ठरवले की, मला यात जर काही लक्षणीय प्रगती साधायची असेल, तर त्यासाठी श्रीगुरूंचा शोध घेणे गरजेचे आहे. म्हणून, मी माझ्या बारा विद्यार्थ्यांसह भारतातील दोन महिन्यांच्या शैक्षणिक यात्रेचे आयोजन केले. या यात्रेदरम्यान विद्यार्थ्यांना गूढवाद, ध्यानधारणा आणि भारतीय संस्कृती यांविषयी अधिक शिकता येणार होते—आणि कदाचित एका सद्गुरूंशी माझी भेट होणार होती.

माझा एक मित्र होता, जो वर्ष १९७०मध्ये बाबांना कॅलिफोर्नियात भेटला होता. या यात्रेला आम्ही निघत असतानाच त्याने मला सल्ला दिला, "स्वामी मुक्तानंदांची भेट *न चुकता* घे!" मी त्याचा सल्ला मानला आणि या यात्रेतील आमचा पहिला मुक्काम बाबांच्या आश्रमात करण्याची योजना आखली. मला न सांगताच, माझ्या या मित्राने बाबांना पत्र पाठवून असे कळवले होते की, काही अमेरिकन विद्यार्थी त्यांच्या भारतयात्रेदरम्यान बाबांच्या भेटीला येणार आहेत.

२५ मार्च, १९७२ रोजी, विमानतळापासून ते त्या वेळी असलेल्या श्रीगुरुदेव आश्रमापर्यंतचा [जे आता गुरुदेव सिद्धपीठ म्हणून ओळखले जाते] आमचा प्रवास आम्ही एका सरकारी बसमध्ये बसून केला. ती बस, कामावर जाणाऱ्या लोकांनी खचाखच भरली होती, काही लोक बाजारात विकण्यासाठी असलेल्या वस्तूंनी भरलेल्या टोपल्या घेऊन जात होते आणि इतर अनेक लोक, ओरडणाऱ्या, गलेलठ्ठ शेळ्यामेंढ्यांसह प्रवास करत होते.

माझे विद्यार्थी आणि मी अगदी वेगळेच दिसत होतो. आम्ही आमच्या पिढीच्या तरुणांना शोभेशा पोषाखात होतो—जागोजागी फाटलेल्या निळ्या जीन्स, मळलेले आणि चुरगाळलेले कपडे, बांधणीचे रंगीबेरंगी शर्टस्—तसेच आमच्या सर्व सामानाने भरलेल्या, पाठीवर लटकवलेल्या बॅग्ज्.

आम्ही गुरुचौकात म्हणजे आश्रमाच्या अंगणात जेव्हा प्रवेश केला, तेव्हा मला एक आश्चर्यकारक दृश्य दिसले. साध्या, स्वच्छ, सुती कापडाच्या पोषाखात अनेक लोक गुरुचौकामध्ये शांतपणे उभे होते.

त्यांच्यातील एका व्यक्तीने येऊन आमचे स्वागत केले आणि विचारले, “तुम्हाला बाबांना भेटायचे आहे का?” आम्ही उत्साहाने प्रतिसाद दिला, “हो, नक्कीच!”

मी पाहिले की, बाबा एका उंचशा आसनावर बसले होते आणि आम्ही त्यांच्याजवळ जाताच त्यांचे लक्ष आमच्याकडे गेले. आमचा परिचय करवून दिला जात असताना, बाबा आम्हाला खालपासून वरपर्यंत पाहत होते. आमच्याकडे स्पष्टपणे पाहता यावे यासाठी त्यांनी त्यांचा काळा चष्मादेखील काढून ठेवला होता. मग त्यांच्या चेहऱ्यावर एक विशाल हास्य पसरले आणि ते म्हणाले, “हो, मला माहीत आहे की, तुम्ही सर्वजण अतिशय चांगल्या कुटुंबांतील आहात.”

बाबांचे शब्द ऐकून मला खूप आनंद झाला. ते आमच्या कौटुंबिक पार्श्वभूमीहून अधिक गहन अशा संदर्भात बोलत असावेत याची मला जाणीव झाली. का कोणास ठाऊक, पण मला जाणवले की, आमचे कपडे इतके मळलेले आणि चुरगाळलेले असूनही बाबांनी आमचे हृदय पाहिले होते आणि त्यांनी हे ओळखले होते की, आम्ही चांगला हेतू असलेले चांगले लोक आहोत.

बाबांनी मोठ्या प्रेमाने त्यांच्या आश्रमात आमच्या या लहानशा गटाचे स्वागत केले. वरच्या बाजूच्या बगिच्यातील एक बंगला त्यांनी आम्हाला राहण्यासाठी दिला आणि आमच्यासाठी विशेष प्रकारचे मसालेविरहित भोजन बनवायला सांगितले.

दुसऱ्या दिवशी सकाळी, आम्ही सूचनाफलकावर लावलेली आश्रमातील दैनंदिन कार्यक्रमांची सूची वाचली. पहाटे ३.३० वाजता दिवस सुरू होत असे आणि रात्री ९.०० वाजता समाप्त होत असे. आणि दिवसभर अनिवार्य असे कार्यक्रम असत : नामसंकीर्तनांची सत्रे, ध्यान, आणि सेवा. बाबांचा हा आश्रम संपूर्ण भारतात कडक शिस्तीसाठी प्रसिद्ध होता. बाबांनी स्वतः दैनंदिन कार्यक्रमांची रचना अशा प्रकारे केली होती जेणेकरून साधकांना स्वतःच्या अंतरात्म्याची अनुभूती होण्यास मदत व्हावी.

ही दिनचर्या पाहून माझे विद्यार्थी अवाक झाले. त्यांना हे सगळे नको होते, म्हणून आश्रम सोडून जाण्यासाठी त्यांनी त्यांच्या सामानाची आवराआवर करण्यास सुरुवात केली. माझी अवस्था चिमटीत सापडल्यासारखी झाली होती. मला बाबांच्या सहवासात अजून काही काळ राहायचे होते, परंतु विद्यार्थ्यांची जबाबदारी माझ्यावर असल्या कारणाने, मला माहीत होते की, विद्यार्थी जर आश्रमातून गेले, तर मलादेखील जाणे भाग आहे.

अगदी त्याच वेळी आम्हाला बाबांचा निरोप आला, “तीन दिवस माझे पाहुणे म्हणून इथे राहा. तुम्हाला फक्त भोजनाच्या कार्यक्रमातच यायचे आहे.”

माझ्या विद्यार्थ्यांना तर खूप आनंद झाला. बाबांनी सांगितलेली ही दिनचर्या त्यांच्यासाठी सोपी होती. मी स्वत: आश्चर्याने आणि कृतज्ञतेने भारावून गेले होते, कारण आता मी तिथे राहू शकणार होते आणि बाबांच्या सहवासात अधिक काळ व्यतीत करू शकणार होते. आम्ही आमच्या बॅग्ज् परत उघडल्या आणि खोल्यांमध्ये निवांत राहिलो.

बाबांनी आश्रमात वास्तव्यास असणाऱ्या एका व्यक्तीला सांगितले की, त्याने आम्हाला आश्रम दाखवावा. नंतर त्यांनी दुसऱ्या एका व्यक्तीला सांगितले की, त्याने आम्हाला गणेशपुरी गावात भगवान नित्यानंदांच्या मंदिरात दर्शनासाठी न्यावे. प्रत्येक दिवशी माझे विद्यार्थी आणि मी बाबांनी सांगितल्याप्रमाणे भोजनासाठी अन्नपूर्णा भोजनकक्षामध्ये जात होतो; जिथे बाबांनी आमच्यासाठी एका विशेष भोजन-रांगेची व्यवस्थादेखील केली होती. तीन दिवस आम्ही आनंदाने आश्रमात राहिलो.

आमची भारतातील यात्रा संपल्यावर, आमच्यातील अनेक विद्यार्थी सिद्धयोग मार्गाच्या शिकवणींचे अनुसरण करू लागले. मी संन्यासदीक्षा ग्रहण केली आणि एक सिद्धयोग स्वामी बनून माझे जीवन श्रीगुरुसेवेसाठी समर्पित केले.

जेव्हाजेव्हा मला झालेल्या बाबांच्या त्या पहिल्या दर्शनाविषयी मी विचार करते, तेव्हातेव्हा मला त्यांच्या अनंत करुणेचे स्मरण होते. आमची परिस्थिती कशीही जरी असली, तरी त्यांच्या करुणेमुळेच आमच्यातील प्रत्येकाला त्यांची कृपा ग्रहण करणे शक्य झाले होते. ते आमचे सर्वात सुंदर आणि श्रेष्ठ स्वागत होते.

© २०२३ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.